निवृत्तीचा निर्णय विश्वचषकानंतर - रोनाल्डो

न्यूयॉर्क : पोर्तुगालचा तारांकित आक्रमक आणि कर्णधार ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीबाबत अलीकडे चर्चा केली जात आहे. 'राउंड ऑफ ३२'च्या सामन्यापूर्वी त्याच्या बहिणीने ही रोनाल्डोची अखेरची स्पर्धा असल्याचे वक्तव्य केले होते. मात्र, रोनाल्डोने स्वतः आता या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. "मी अद्याप काहीही ठरवलेले नाही. सध्या मी विश्वचषक स्पर्धेवर लक्ष केंद्रित केले आहे. स्पर्धा संपल्यानंतर कुटुंबाशी चर्चा करेन आणि योग्य तो निर्णय घेईन," असे रोनाल्डो म्हणाला. रोनाल्डोच्या पोर्तुगाल संघाची उपउपांत्यपूर्व फेरीत स्पेनशी गाठ पडणार आहे.

४ किलियन एम्बापेच्या पेनल्टीमुळे फ्रान्सने विश्वचषक इतिहासातील आपला १५०वा गोल नोंदवला. ब्राझील, जर्मनी आणि अर्जेंटिना यांच्यानंतर हा ऐतिहासिक टप्पा गाठणारा फ्रान्स चौथा संघ ठरला.

पॅराग्वेचे डावपेच फोल!

एम्बापेच्या पेनल्टीमुळे फ्रान्सचा विजय; उपांत्यपूर्व फेरीत धडक

वृत्तसंस्था, फिलाडेल्फिया

विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आतापर्यंत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवणाऱ्या फ्रान्सला यावेळी विजयासाठी झुंजावे लागले. पॅराग्वेने आक्रमक आणि धोकादायक खेळ करत फ्रान्सच्या खेळाडूंना डिवचण्याचा अनेकदा प्रयत्न केला. मात्र, फुटबॉलमध्ये 'डार्क आर्ट्स' मानले जाणारे हे डावपेच फोल ठरले. फ्रान्सने १-० अशी संघर्षपूर्ण सरशी साधली. किलियन एम्बापे याने उत्तरार्धात पेनल्टीवर केलेल्या एकमेव गोलच्या जोरावर फ्रान्सने स्पर्धेतील सलग पाचवा विजय नोंदवताना उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता त्यांच्यासमोर मोरोक्कोचे आव्हान असेल.

बाद फेरीच्या पहिल्या लढतीत जर्मनीला पेनल्टी शूटआऊटमध्ये धक्का देत पॅराग्वेने सर्वांचे लक्ष वेधले होते. त्यामुळे फ्रान्सविरुद्धही ते आव्हान उभे करतील, अशी अपेक्षा होती. तसे झालेही, पण त्यासाठी त्यांनी अनेकदा वादग्रस्त आणि प्रतिस्पर्धी खेळाडूंना इजा पोहचवू शकेल, अशा खेळाचा आधार घेतला.

वादग्रस्त घटना

- आंद्रेस कुबासचा ॲड्रियन राबिओवर धोकादायक टॅकल.
- जुआन होसे कासेरेसची किलियन एम्बापेला लाथ.
- गॅब्रिएल आवालोसचे उपामेकानोच्या पोटात कोपर.
- गुस्तावो वेलास्केझने पेनल्टी स्पॉट खराब करण्याचा प्रयत्न.
- अंतिम शिट्टीनंतर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये चकमक.

'जशास तसे उत्तर'

सामन्यानंतर एम्बापेने पॅराग्वेच्या डावपेचांवर उपरोधिक टिप्पणी केली. "आम्हालाही कठोर फुटबॉल खेळता येते. त्यांना (पॅराग्वे) वाटले आम्ही टक्सिडो घालून मैदानात उतरू, पण आम्ही पूर्ण तयारीत होतो. प्रतिस्पर्ध्याला जशास तसे उत्तर कसे द्यायचे हे आम्हाला ठाऊक आहे. त्यांनी त्यांच्या पद्धतीने सामना जिंकण्याचा प्रयत्न केला. मात्र, अखेरीस विजय आमचाच झाला," असे एम्बापे म्हणाला.

११ एम्बापेने २०१८ मध्ये विश्वचषक पदार्पण केले. तेव्हापासून विश्वचषकाच्या बाद फेरीत त्याने ११ गोल केले असून या कालावधीत ब्राझील (१०), इंग्लंड (१०), पोर्तुगाल (९) आणि स्पेन (४) या संघांपेक्षाही त्याची कामगिरी सरस आहे.

दक्षिण अमेरिकन संघ प्रत्येक डावपेच वापरतात. पॅराग्वे संघ विशेषतः एम्बापेला लक्ष्य करेल हेही आम्हाला ठाऊक होते. पॅराग्वेचा बचाव उत्कृष्ट होता, पण त्यांचा खेळ प्रेक्षकांना आकर्षित करणारा नव्हता. **- दिदिएर डेशॉम्प,** प्रशिक्षक, फ्रान्स

आमचे खेळाडू योद्ध्यांप्रमाणे लढले. फ्रान्सला सहजासहजी गोलची संधी निर्माण करता आली नाही. आमच्यासाठी ही मोठी गोष्ट आहे. अखेर वैयक्तिक कौशल्य आणि 'व्हीएआर'च्या मदतीने मिळालेल्या पेनल्टीने त्यांनी विजय मिळवला. **- गुस्तावो अल्फारो,** प्रशिक्षक, पॅराग्वे

फ्रान्सचा पंचांवर संताप

सामन्यादरम्यान पॅराग्वेच्या खेळाडूंनी फ्रान्सच्या खेळाडूंवर कठोर टॅकल केले. आंद्रेस कुबासने ॲड्रियन राबिओला धोकादायक पद्धतीने पाडले, तर जुआन होसे कासेरेसने एम्बापेला लाथ मारली. तरीही पंचांनी कोणतीही कारवाई केली नाही. विशेष म्हणजे फ्रान्सच्या मनू कोने, ब्रॅडली बार्कोला आणि मायकल ओलिसे यांना पिवळे कार्ड दाखवण्यात आले, तर पॅराग्वेच्या एकाही खेळाडूला संपूर्ण सामन्यात कार्ड मिळाले नाही. फ्रान्सने केलेले अपील पंचांनी वारंवार फेटाळून लावल्याने खेळाडूंनी अनेकदा संताप व्यक्त केला.

'व्हीएआर'नंतर पेनल्टी

पॅराग्वेने बचावही भक्कम ठेवला होता. त्यामुळे फ्रान्सला गोलची संधी निर्माण करणेही अवघड जात होते. अखेर सामन्याच्या ७०व्या मिनिटाला फ्रान्सच्या प्रयत्नांना यश आले. डिझेरे डुए याला पेनल्टी क्षेत्रात दिएगो गोमेझने अडविल्यानंतर पंच इलगिझ तंताशेव यांनी 'व्हीएआर'च्या मदतीने घटना पुन्हा पाहिली आणि फ्रान्सला पेनल्टी दिली. पेनल्टीपूर्वीही पॅराग्वेच्या खेळाडूंनी पंचांभोवती गर्दी करून निर्णयाला विलंब करण्याचा प्रयत्न केला. गुस्तावो वेलास्केझने पेनल्टी स्पॉट खराब करण्याचाही प्रयत्न केला. मात्र, या सगळ्या गोंधळातही एम्बापेने कोणतीही चूक न करता चेंडू जाळ्यात धाडत फ्रान्सला आघाडी मिळवून दिली. या गोलमुळे एम्बापेच्या या विश्वचषकातील गोलांची संख्या सात झाली असून 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत त्याने लिओनेल मेसीशी बरोबरी साधली आहे. विश्वचषक कारकीर्दीत एम्बापेचे १९ सामन्यांत १९ गोल झाले आहेत.

मोरोक्कोची विजयी घोडदौड

कॅनडावर सलग दुसऱ्या विश्वचषकात मात; उनोहीचे दोन गोल

वृत्तसंस्था, ह्यूस्टन

विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत जेतेपदाचे 'डार्क हॉर्स' अशी ओळख निर्माण केलेल्या मोरोक्कोने आणखी एक महत्त्वाची कसोटी यशस्वीपणे पार केली. नेदरलँड्सविरुद्ध 'पेनल्टी शूटआऊट'मध्ये थरारक विजय मिळवल्यानंतर मोरोक्कोने सह-यजमान कॅनडाचे आव्हान ३-० असे परतवून लावत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. यंदाच्या स्पर्धेत मोरोक्कोचा पाच सामन्यांत हा चौथा विजय ठरला. आता उपांत्यपूर्व फेरीत त्यांना बलाढ्य फ्रान्सला सामोरे जावे लागणार आहे.

उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत मोरोक्कोला सुरुवातीला अपेक्षित खेळ करता आला नाही. मात्र, उत्तरार्धात बचावफळीचा शिस्तबद्ध खेळ आणि आक्रमकांची अचूकता याच्या जोरावर त्यांनी कॅनडाला निष्प्रभ केले. मोरोक्कोने सलग दुसऱ्या विश्वचषकात कॅनडावर विजय मिळवला. यापूर्वी २०२२च्या स्पर्धेत त्यांनी साखळी फेरीत कॅनडाला २-१ असे नमवले होते.

गेल्या सामन्यानंतर कॅनडाच्या तुलनेत त्यांना २४ तास कमी विश्रांती मिळाली होती. या दोन्ही गोष्टींचा परिणाम त्यांच्या सुरुवातीच्या खेळावर स्पष्टपणे दिसून आला. सामन्याच्या पहिल्या काही मिनिटांत मोरोक्कोची पासिंग प्रभावी नव्हती. खेळाडूंमध्ये समन्वयाचा अभाव जाणवत होता.

सामन्याचा सर्वाधिक चर्चेचा क्षण ४०व्या मिनिटाला घडला. लांब चेंडूचा पाठलाग करत असताना मोरोक्कोचा कर्णधार अश्रफ हकिमीने कॅनडाचा बचावपटू रिची लारियाला धक्का देत खाली पाडले. त्यानंतर लारियानेही तीव्र प्रतिक्रिया दिल्याने मैदानावरील वातावरण काही क्षण तणावपूर्ण झाले. पंचांनी तात्काळ हस्तक्षेप करत दोन्ही खेळाडूंना पिवळे कार्ड दाखवले आणि वाद टाळला. या प्रसंगानंतर कॅनडाने आणखी आक्रमक भूमिका घेत मोरोक्कोवर सातत्याने दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अंतिम टप्प्यात मोरोक्कोच्या बचावफळीने एकही मोठी चूक केली नाही. या स्पर्धेत शिस्तबद्ध आणि संघटित बचावफळी ही मोरोक्कोची सर्वांत मोठी ताकद ठरते आहे. कॅनडा संघाने सतत दबाव निर्माण करूनही मोरोक्कोच्या बचावपटूंनी संयम राखला, योग्य वेळी अडथळे निर्माण केले व गोलरक्षकाला फारशी कठीण परिस्थिती निर्माण होऊ दिली नाही.

उत्तरार्धात मोरोक्कोने आक्रमक खेळ केला. ५०व्या मिनिटाला मिळालेल्या फ्री-किकवर हकिमीने दिलेल्या पासवर मध्यरक्षक अझेदीन उनोहीने गोलकक्षाबाहेरून फटका मारत मोरोक्कोचे गोलखाते उघडले. उनोहीनेच मग ८२व्या मिनिटाला, तर ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत सोफियान रहिमीने गोल नोंदवत मोरोक्कोचा विजय सुनिश्चित केला. या दोनही गोलसाठी ब्राहिम डियाझने साहाय्य (असिस्ट) केले.

आजचा लक्षवेधी सामना

स्पेन विरुद्ध पोर्तुगाल

- विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीतील सर्वाधिक चर्चेचा ठरणारा सामना स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यात रंगणार आहे. या लढतीत स्पेनची लामिन यमाल, पोर्तुगालची ख्रिस्तियानो रोनाल्डोवर भिस्त असेल.

- वेळ : रात्री १२.३० वा. (मंगळवार)
- थेट प्रक्षेपण : युनाइट ८ स्पोर्ट्स, झी ५

अन्य सामना

- अमेरिका वि. बेल्जियम

वेळ : सकाळी ५.३० वा. (मंगळवार)

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी इ. विकारांवर असरदार !
संपर्क - डॉ. अभिजीत (आयुर्वेदाचार्य)
9422011723
www.dhoutiyog.co.in

जोकोविचचे विक्रमी यश

लंडन : विक्रमी २५व्या ग्रँडस्लॅम जेतेपदाच्या शोधात असलेल्या नोव्हाक जोकोविचने विम्बल्डन टेनिस स्पर्धेतील दमदार कामगिरी सुरू ठेवताना उपांत्यपूर्व फेरी गाठली. विम्बल्डनमधील त्याचा हा १०६वा विजय ठरला. त्यामुळे त्याने या स्पर्धेच्या पुरुष एकेरीत सर्वाधिक विजयांचा रॉजर फेडररचा विक्रम मोडला. महिलांमध्ये अमेरिकेच्या जेसिका पेगुला आणि चेकियाच्या कॅरोलिना मुचोव्हाने आगेकूच केली.

जोकोविचने बिगरमानांकित रोमन साफिऊल्लिनवर ७-६ (८-६), ६-३, ३-६, ६-३ असा विजय मिळवला. जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेवने मार्कस गिरोनला ६-२, ७-६ (७-४), ६-४ असे पराभूत केले.

महिलांमध्ये पेगुलाने इवा जोविचवर ४-६, ६-३, ६-१ अशी मात करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. मुचोव्हाने आपल्या देशाच्या बार्बोरा क्रेजिकोव्हाचा ७-५, ५-७, ६-३ असा पराभव केला.

सेरेनाची माघार : सेरेना विल्यम्स पुनरागमनाच्या स्पर्धेत दुहेरीत बहीण व्हीनससह खेळणार होती. सेरेनाला एकेरीच्या लढतीत पराभूत व्हावे लागले, त्यादरम्यान तिला दुखापत झाली होती. त्यामुळे तिला दुहेरीतूनही माघार घ्यावी लागली आहे. "टेनिसमध्ये पुनरागमन करणे ही माझ्यासाठी एक भेटच होती. त्यात व्हीनससह खेळण्यास मिळणे ही त्याहूनही मोठी गोष्ट होती. मात्र, गुडघ्याला झालेल्या दुखापतीतून मी सावरू शकले नाही," असे सेरेना म्हणाली.

श्रीराम फायनान्स लिमिटेड

SHRIRAM Finance

CIN No- L65191TN1979PLC007874
नोंदणीकृत कार्यालय : श्री टॉवर, प्लॉट नं. १४ ए, दक्षिण भाग, औद्योगिक वसाहत, गुंडी, चेन्नई - ६०००३२.
प्रशासकीय कार्यालय : ६ वा मजला (लेव्हल २), इमारत क्र. क्यू २, औरम क्यू पार्क, जीईएन ४/१, टीटीसी, ठाणे - बेलापूर रोड, घणसोली, नवी मुंबई - ४००७१०.

सुवर्ण कर्ज लिलाव सूचना

खालील नमूद कर्जदारांना त्यांनी श्रीराम फायनान्स लि. (एसएफएल) कडून घेतलेल्या सुवर्ण अलंकारांच्या समक्ष कर्जाची ("सुविधा") त्यांची थकबाकी अदा करण्यासाठी सूचना वितरित करण्यात आली आहे. कर्जदार त्यांची सदर सुविधेंतर्गतची थकबाकी अदा करण्यास असमर्थ राहिल्यामुळे आम्ही तारण सुवर्ण अलंकारांचा **१६/०७/२०२६ (लिलावाची तारीख)** रोजी लिलाव आयोजित करणार आहोत. सदर लिलावामधून काही अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात आल्यास संबंधित कर्जदाराला ती परत करण्यात येईल आणि लिलावपश्चात त्यामध्ये तूट असल्यास, शिल्लक रक्कम योग्य कायदेशीर प्रक्रियेद्वारे कर्जदाराकडून वसूल करण्यात येईल. एसएफएलला कोणतीही पूर्वसूचना दिल्याविना खालीलपैकी कोणतेही खाते लिलावामधून काढून टाकण्याचा अधिकार आहे. काही अनपेक्षित घटना घडल्यास, एसएफएलने पूर्वसूचना न देता लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

पार्टीचे नाव	पार्टीचे नाव	पार्टीचे नाव
अजिंक्य शंकर पवार	जावेद असलम मनेर	संगीता विजय उंबरकर
अमिलखजा महिबुलाल दोनोर	क्रीष्णा नाथ करडे	संतोष रामचंद्र ढवळे
अमित मनोहर जगताप	पल्लवी अमित कांबळे	स्वप्निल शशिकांत देवकर
गणेश किसान शिंदे	पल्लवी ज्ञानेश्वर खडसारे	तृप्ति रविराज शिंदे
गौरव प्रकाश देशपांडे	राहुल नारायण जाधव	विश्वास हनमंत पवार
हरिदास रामचंद्र ढवळे	रोहित बापूसो खलाटे	

वरील सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव पुढील पत्त्यावर होईल : श्रीराम फायनान्स लि., ४३, दुकान क्रमांक युजी-४, सम्राट हाईट, सदाशिव पेठ, खान अली, सातारा- ४१५००२. - लिलावाची वेळ: दुपारी ०१.०० वाजता. वेळेच्या मर्यादेमुळे लिलाव त्याच दिवशी पूर्ण न झाल्यास सदर लिलाव लगतच्या कामकाजाच्या दिवशी समान वेळेला आणि अटींवर पुढे चालू राहील, याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकाचे निधन झाले असल्यास लिलावासंबंधित सर्व अटी त्याच्या / तिच्या कायदेशीर वारसांना लागू राहतील. **अधिक माहिती, अटी व शर्तींसाठी आणि लिलावामध्ये भाग घेण्याकरिता नोंदणी प्राप्त करण्यासाठी इच्छुक खरेदीदारांनी श्री. महेश गायकवाड (७२०८४१५१९५)/श्री. रोशन जुईकर (९९६७२००५७२) यांना संपर्क करावा.**

दिनांक : ०६/०७/२०२६
स्थळ : सातारा

सही/-
श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड
अधिमंडळ मान्यताप्राप्त लिलावकर्ते
श्रीराम फायनान्स लि. करिता

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-अ - अचल मालमत्तांची ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: नववा मजला, अंतरिक्ष भवन, 22, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-110001 फोन: 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईट: www.pnbhousing.com

शा.का. पिंपरी चिंचवड: ऑफिस क्र. 302, तिसरा मजला, घीवाला कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, चिंचवड, पुणे, महाराष्ट्र - 411019. **शा.का. पुणे:** युनिट क्र. 601, 602, 603, 604, 605, 606, सहावा मजला, प्राइड हॉटेल कॉन्क्लेवच्या मागे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र - 411005 **शा.का. कोल्हापूर:** 401/402, चौथा मजला, मातोश्री प्लाझा, विनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र - 416001. **शा.का. कोराडी:** तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्वे क्र. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014.

याद्वारे खाली स्तंभ क्र.-अ मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ-ड मध्ये नमूद अचल मालमत्तांचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पीएनबी एचएफएल)/सुरक्षित धनको** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **रचनात्मक/प्रत्यक्ष ताबा** घेतलेला असून (स्तंभ-क मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **"जशी आहे जेथे आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार/गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या** वेबसाइटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (अ)	मागणी केलेली रक्कम आणि दिनांक (ब)	ताब्याचे स्वरूप (क)	तारण मालमत्तांचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (ई)	बयाणा रक्कम (आरक्षित किमतीच्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी रक्कम (एच)	पाहणी दिनांक आणि वेळ (आय)	लिलाव दिनांक आणि वेळ (जे)	ज्ञात बोजे / न्यायालयीन खटले असल्यास (के)
NHL/PM/0118/480738, रवींद्र हनुमंत वाघेरे / शुभांगी रवींद्र वाघेरे, शा.का.: पिंपरी चिंचवड	रु. 71,73,836.57 आणि 09-12-2022	प्रत्यक्ष ताबा	दुकान क्र. 3, श्रीधन अपार्ट., फेज I, पिंपरी कॉलनी, गल्ली क्र. 2, रिवरसाईड डीपी रोड, पिंपरी वाघेरे, पुणे, महाराष्ट्र - 411017, भारत.	रु. 32,15,000	रु. 3,21,500	21/07/2026	रु. 10,000	06-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाहीत
			दुकान क्र. 4, तळ मजला, श्रीधन अपार्टमेंट, फेज I, पिंपरी कॉलनी, गल्ली 2, रिवरसाइड डीपी रोड, पिंपरी वाघेरे, पुणे, महाराष्ट्र - 411017, भारत.	रु. 14,56,000	रु. 1,45,600		रु. 10,000			
			दुकान क्र. 5, तळ मजला, श्रीधन अपार्टमेंट, फेज I, पिंपरी कॉलनी, गल्ली 2, रिवरसाइड डीपी रोड, पिंपरी वाघेरे, पुणे, महाराष्ट्र - 411017, भारत.	रु. 17,03,000	रु. 1,70,300		रु. 10,000			
HOU/KRDI/0121/855515, प्रसाद नारायण साहू / प्रेमलता प्रसाद साहू, शा.का.: पुणे	रु. 23,08,346.81 आणि 21-04-2023	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग ए, बारावा मजला, सदनिका क्र. 1201, वॅलोरा टॉवर्स, सर्वे क्र. 8/3, 8/3/3, केशवनगर रोड, रेणुका गावाजवळ, मुंढवा, ता. हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र - 411036, भारत.	रु. 38,59,601	रु. 3,85,960	21/07/2026	रु. 10,000	09-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	विकसकाची थकबाकी 32,71,399/-
HOU/KOP/0518/530531 & NHL/KOP/0618/549306, पंकजा प्रकाश कावठेकर / प्रकाश जोसेफ कावठेकर, शा.का.: कोल्हापूर	रु. 35,43,332.33 आणि 30-09-2023	प्रत्यक्ष ताबा	गट क्र. 237, सी.एस.क्र. 18334, प्लॉट क्र. 14, मौजे शहापूर, हातकणंगले, कोल्हापूर, महाराष्ट्र - 416115, भारत	रु. 30,21,000	रु. 3,02,100	21/07/2026	रु. 10,000	17-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
HOU/PUN/0516/288248, मंगेश श्रीपत नारे / मृण्मयी एम नारे, शा.का.: पुणे	रु. 17,16,899.94 आणि 13-03-2025	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग ए1, 1, 104, प्लेटर पौड ए, गट क्र. 222 ते 226/230, तहसीलदार कार्यालयाजवळ, पौड गाव मुळशी, पुणे, महाराष्ट्र - 412108, भारत.	रु. 1,08,7000	रु. 1,08,700	21/07/2026	रु. 10,000	17-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
HOU/PUNE/0318/501987, देवराज दामोदर धेंडे / वैशाली देवराज धेंडे, शा.का.: पुणे	रु. 11,77,099.78 आणि 14-05-2025	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग सी1, तळ मजला, 8, प्लेटर पौड सी, गट क्र. 245 (पी), पौड गाव, मुळशी, पुणे, महाराष्ट्र - 412115, भारत.	रु. 9,04,000	रु. 90,400	21/07/2026	रु. 10,000	18-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही
HOU/KRDI/0718/559803, देवराम भानाराम चौधरी / प्तियादेवी देवराम चौधरी शा.का.: खराडी	रु. 29,48,670.69 आणि 15-04-2025	प्रत्यक्ष ताबा	विंग एफ, दुसरा मजला, 203, स्वप्नलोक फेज II, सर्वे क्र. 201/1/1पी आणि 201/2/1पी आणि 201/2/2पी, काळे पडळ, फुरसुंगी डीपी रोड, पापडे वस्ती, फुरसुंगी, ता. हवेली, सर्वे क्र. 201/3 पी आणि 202 पी, पुणे, महाराष्ट्र - 412308, भारत.	रु. 28,25,000	रु. 2,82,500	21/07/2026	रु. 10,000	06-07-2026 रोजी दु. 12.00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत	22-07-2026 रोजी दु. 2.00 ते दु. 3.00 वाजेपर्यंत	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ क्र.-के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल/अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे/दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने/बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. 1. आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकूम नाही आणि त्याची स्थिती स्तंभ-के मध्ये नमूद करण्यात आली आहे. 2. संभाव्य खरेदीदारांनी/बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ-के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा/बोली अर्ज सादर करण्याआगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदारास बोली प्रपत्रासोबत सदर लिलावाच्या अटी व शर्तींवर स्वाक्षरी करावी लागेल. 3. कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येते. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल, अन्यथा मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. 4. प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरयाणा, 122003 येथे कॉर्पोरेट कार्यालय असलेल्या मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. वेबसाईट: www.bankeauctions.com मालमत्ता पाहणीशी किंवा बोली दस्तावेज प्राप्त करण्याशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा नोंदणीसाठी आपण पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी श्री गणेश अंकुश / नीलाक्षी पाटील, टोल फ्री : 18001208800, ईमेल: auction.pnbhousing.com वर संपर्क साधावा, किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

स्थान: पुणे
दिनांक: 04.07.2026

स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे (मेस्को)

दुसरा मजला, रायगड इमारत, घोरपडी, पुणे-४११००१
संपर्क : ०२०-२६३०२६५९, मो.नं.:- ९३७३१६४९६२
ई-मेल : contact@mescoltd.co.in
मेस्को वेब साईट : www.mescoltd.co.in

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.(मेस्को) पुणे मध्ये महाराष्ट्र शासनातून, प्रशासनिक कार्याचा अनुभव असणाऱ्या व शासनातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना खालील पदावर प्रथम ३ महिने व जास्तीत जास्त ६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नेमणुकीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	पदाचे नाव, पद संख्या व ठिकाण
१.	**प्रशासन सल्लागार - ०२** (i) पुणे - ०१ (ii) मुंबई - ०१

१. वरील पदांसाठीच्या अटी व शर्ती मेस्कोच्या www.mescoltd.co.in या वेबसाइटवर अपलोड केल्या आहेत.
२. इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपले अर्ज प्रत्यक्षरित्या किंवा ई मेलद्वारे मेस्कोच्या वेबसाइटवर दिलेल्या पत्त्यावर व ई मेल वर पाठवावेत.
३. अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीख **२० जुलै २०२६.**

व्यवस्थापकीय संचालक, मेस्को, पुणे

सिडको शहरांचे शिल्पकार

शुद्धिपत्रक क्र. ०१ (प्रथम मुदतवाढ)

नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये तारांकित हॉटेल (थ्री स्टार व त्यावरील) वापराकरिता 07 भूखंड भाडेपट्ट्याने उपलब्ध

योजना क्र. : एमएम/५०/२०२६-२७

सिडको महामंडळातर्फे गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजीच्या दैनिक लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, द न्यु इंडियन एक्सप्रेस आणि नवभारत मध्ये उपरोक्त शीर्षकांतर्गत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली असून सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

सुधारित वेळापत्रक :

१) ई-निवेदेकरिता अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा शुल्क भरणा व प्रक्रिया शुल्क भरणा इ. करीता सुधारित तारीख दि. ०६.०७.२०२६ ऐवजी **दि. २०.०७.२०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अशी असणार आहे.
२) बंद निविदा सादर करण्याकरिता सुधारित तारीख दि. ०६.०७.२०२६ ऐवजी **दि. २०.०७.२०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अशी असणार आहे.
३) ई-लिलावाकरिता अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा शुल्क भरणा व प्रक्रिया शुल्क भरणा इ. करीता सुधारित तारीख दि. ०७.०७.२०२६ ऐवजी **दि. २१.०७.२०२६ रोजी १२.०० वाजेपर्यंत** अशी असणार आहे.
४) ई-लिलावाकरिता सुधारित तारीख दि. ०७.०७.२०२६ ऐवजी **दि. २१.०७.२०२६ रोजी ११.०० वाजेपासून ते १८.०० वाजेपर्यंत** अशी असणार आहे.
५) कागदपत्र पडताळणीकरिता सुधारित तारीख दि. ०८.०७.२०२६ ऐवजी **दि. २२.०७.२०२६** अशी असणार आहे.
६) निकाल घोषित करण्याची तारीख : यथावकाश कळविण्यात येईल.

पणन व्यवस्थापक (वाणिज्यिक)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०८६(अ)/२०२६-२७

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्र. - १२६९/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक - अजित पवार प्रतिष्ठान

पार्थ अजित पवार - अर्जदार

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त -२, पुणे विभाग पुणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) **वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?**
२) **खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?**

अ. जंगम मिळकत - ११,००,०००/-
ब. स्थावर मिळकत - निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफितीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल. व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस मी, माझे सहीनिशी, आणि मा. धर्मादाय आयुक्त -४ पुणे विभाग पुणे, महाराष्ट्र राज्य यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का

स्वाक्षरी/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे.

लोणावळा नगरपरिषद

स्थापना-१८७७

बांधकाम विभाग सन २०२६-२७
जाहीर ई निविदा सूचना क्र. ८

जा.क्र. लोनप ५/बांधकाम/ई. निविदा/जा. प्रसिध्दी/२०२६-२७/२१३२ **दिनांक - ०२/०७/२०२६**

लोणावळा नगरपरिषदेच्या मान्यतेने व वतीने नगरपरिषद निधीतून / शासनाच्या विविध विकास योजनेतून खालील प्रमाणे कामाकरीता अनुभव असणारया व शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून जाहीर ई निविदा मागविणेत येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कमेच्या % बेसीसवर	इसारा रक्कम रूपये	कालावधी	निविदा फॉर्मची किंमत रूपये (18% GST सहीत)
१	लोणावळा नगरपरिषद हद्दीतील राजमाची गार्डन ते कुणेगाव हद्दीतील नगरपरिषद मालकीच्या जागेमध्ये रोपवे प्रोजेक्ट राबवणेकामी अंदाजपत्रक व आराखडे या कामीचा संपूर्ण डी. पी. आर. बनविणेसाठी अनुभवी तांत्रिक सल्लागार यांची नियुक्ती करणे.	दर देणे	१,००,०००/-	६० दिवस	५,९००/-

सदरील कामाचे ई निविदा प्रक्रियेचा संपूणे तपशिल http//mahatender.gov.in Tender by Location Lonavala या संकेतस्थळावर दि. ०६/०७/२०२६ ते दि. १४/०७/२०२६ निविदापत्रक डाऊनलोड रक्कम व इसारा रक्कम ऑनलाईन (Online System) पध्दतीने भरावयाची आहे. त्याचप्रमाणे ई निविदा ऑनलाईन भरण्याची मुदत दि. १४/०७/२०२६ रोजी दुपारी ४.३० वा. पर्यंत आहे. निविदा दि. १५/०७/२०२६ रोजी दुपारी ४.३० वा. उघडण्यात येतील. याबाबत काही अडचण अथवा शंका उद्भवल्यास नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाशी संपर्क साधावा. परसेंटेज बेसीसवर दर देते वेळी कोणतीही निविदाधारकाचे दर हे शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या दरापेक्षा जादाचे आल्यास अशा निविदाधारकांचा विचार केला जाणार नाही.

सर्वसाधारण अटी :-

१. सदर ठेकेदाराचे मान्यता प्राप्त शासनाचे Registration असणे आवश्यक आहे.
२. सदर निविदा धारकांनी अश्या प्रकारचे किमान २ प्रोजेक्ट शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था राबवलेबाबतचे अथवा पूर्ण केलेबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र व GPS Photo जोडणे आवश्यक आहे.
३. सदर रोप वे चा प्रोजेक्ट चेक करून तांत्रिक कन्सल्टंट म्हणून इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्याकडे असलेल्या स्टाफचा चार्ट नगरपरिषदेकडे निविदा भरते वेळेस टेक्निकल डॉक्युमेंटस सोबत जोडणे आवश्यक आहे.
४. सदर इच्छुक निविदाधारकांकडे यासाठी आवश्यक असणारया सर्व प्रकारचा तांत्रिक स्टाफ उदा. यांत्रिकी अभियंता, विद्युत अभियंता, बांधकाम अभियंता (B.E., M. Tech, Diploma) शैक्षणिक आर्हता टेक्निकल डॉक्युमेंट्स सोबत जोडणे आवश्यक आहे
तसेच ई निविदा भरतेवळी अपलोड केलेल्या कागदपत्रांची एक प्रत (Hard Copy) नगरपरिषद कार्यालयात सादर करावी. कोणतेही स्पष्टीकरण न देता निविदा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

सही/- (पंढरीनाथ साठे) नगर अभियंता लोणावळा नगरपरिषद
सही/- (अशोक साबळे) मुख्याधिकारी लोणावळा नगरपरिषद
सही/- (सनी दळवी) बांधकाम समिती सभापती लोणावळा नगरपरिषद
सही/- (देविदास कडू) उपनगराध्यक्ष लोणावळा नगरपरिषद
सही/- (राजेंद्र सोनावणे) अध्यक्ष लोणावळा नगरपरिषद

लोणावळा नगरपरिषद

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहिल्यानगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर* (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.